म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६३३

# "...ारिद्र्य"

अर्थात

# खेडेगांवची सद्यःस्थिती

लेखक

... बी. ए.

( उत्राणकर )

... पश्चिमखानदेश.

REFBK-0003036

१६३३
३०।३।६४

३०३८

१९२६

मुद्रकः—रा. रा चिंतामण सखाराम देवळे, मुंबईवैभव प्रेस,
सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीज् होम, सँढर्स्ट रोड,
गिरगांव–मुंबई.

प्रकाशकः—ए. एस्. देशपांडे बी. ए उत्राण जि. पूर्वखानदेश.

श्री

# अर्पण पत्रिका.

-:o:-

स्वदेशहितार्थ विशेषतः गरीब शेत-

करी बंधूंच्या उन्नतिप्रीत्यर्थ

झटणारे, कांग्रेसभक्त व

[illegible]

REFBK-0003036

श्री. शेठ राजमल लखीचंदजी

यांस

त्याच्या स्वदेश–सेवेबद्दल लेखकाची

ही अत्यल्प कृति अत्यादर-

पूर्वक अर्पण असो.

# लेखकाचे दोन शब्द.

आमचें पारतंत्र्य व आमचें दारिद्य इतकें उघड आहे कीं त्याबद्दल " दोन शब्दाचे " रूपानें वाचकांस निराळें सांगण्याची जरूरच नाहीं. असहयुगापासून ग्रामसुधारणेबद्दल माझ्या वडिलांस ज्यास्त तळमळ लागली होती. लवकरच ते पेन्शन घेणार होते. पेन्शन घेतल्यानंतर स्वग्रामींच स्थायिक व्हावें व वृद्धापकाळ ग्रामबंधूंच्या सेवेंत घालवावा असें त्यांनीं ठरविलें होतें. पण कालगति कांहीं विचित्र होती. गेल्या वर्षीं ते फर्लोवर असतांनाच त्यांची इहलोकीची यात्रा संपली मनांतले विचार मनांतच राहिले. आजचें हें पुस्तक त्यांची थोडीशी इच्छापूर्ति करण्याकरितांच लिहीलें आहे. वास्तविक मला लिहिण्याचा फारसा व्यासंग नाहीं, किंवा अशा विषयावर लिहिण्याचा माझा अधिकारही नाहीं. पण जें जसें दिसलें तें तसेंच लिहिलें आहे व यथामति उपाय सुचविले आहेत. वाचक अननुभवी लेखकाच्या ह्या कृतीचा प्रेमानें स्वीकार करितील अशी आशा आहे. ज्या सद्‌गृहस्थांनीं मला कांहीं उपयुक्त सूचना केल्या त्यांचा व ज्यांनीं प्रकाशनाचे बाबतींत मला मदत केली त्यांचाही लेखक आभारी आहे.

श्यामकुटि, उत्राण<br>ता. १६ आक्टोबर (विजयादशमी) १९२६

सर्वांचा नम्र,<br>लेखक.

# आमचें दारिद्र्य

## अथवा

# खेडेगांवची सद्यःस्थिति

क्र. 3036

## प्रास्ताविक.

लहानपणापासून बघत आहे जें वर्ष येतें तें गेलेल्या वर्षापेक्षां कांहीं चांगलें असत नाहीं. " अज्ञान सौख्यदायी असतें " ह्या म्हणीस अनुसरून बालपणाच्या अज्ञानावस्थेंतून वाढत्या वयाच्या सज्ञानावस्थेंत दिवसेंदिवस आपण प्रवेश करूं लागतों. म्हणजे सौख्यदायी परिस्थितींतून आपण दुःखदायी परिस्थितींतच प्रवेश करतों, म्हणून कदाचित येणारें वर्ष गेलेल्या वर्षापेक्षां चांगलें वाटत नसेल, पण आजकाल परिस्थितीच अशी कांहीं आहे कीं, आम्हां भारतवासीयांना विशेषतः खेड्यांतील शेतकरी बंधूंना दारिद्र्यदुःख भोगल्याविना गत्यंतर नाहीं. ते तर उलट इतर जगापेक्षां जास्त अज्ञानवस्थेंतच आहेत. मग सध्यांच्या वाढत्या दारिद्र्यावस्थेचें कारण काय असेल बरें ? आमच्या शेजारचे पाटीलबुवा लहानपणीं जेव्हां शाळेंत जात असत तेव्हां तुपाचा भाव शेरीं बारा आणे ते रुपया

होता. आज पाटीलबोवाच्या वयास चाळीशी उलटून सात आठ वर्षें झालीं आहेत. आज तुपाचा भाव तिपटीनें वाढला आहे.

संध्याकाळच्या वेळीं पाटीलबोवा डोळ्यावर चाळीशी चढवून ( त्यांना आतांशा दूरचे दिसत नव्हतें म्हणून. अदूर दृष्टीपणामुळें नव्हे हे माझ्या सुज्ञ वाचकांस सांगणें नलगे. ) जेव्हां आमच्या ओटीवर येत असत व त्यांच्या व आमच्या वडिलांच्या शिळोप्याच्या गप्पा चालत असत तेव्हां कित्येक वेळा मीही तेथेंच असें. त्यांचा बोलण्याचा मुख्य विषय "पूर्वी व आतां" हाच बहुशा असे. पूर्वीचे दिवस कसे सुखाचे होते. कुठे ती पूर्वीची स्वस्ताई! ती गेली. पूर्वीच्या सर्व उद्योग धंदेवाल्यांचें पोट कसें भरत असे. आतां पहावें तर सर्व वस्तू महाग ज्वारी महाग, डाळ महाग, तेल तूप महाग, मजूरी महाग, जें पहावें तें सर्व महागच महाग! नाहीं म्हणायला कपाशीला आतां पूर्वींपेक्षां जास्त भाव येतो खरा, पण या महागाईमुळें तोही पुरत नाहीं व त्यामुळें गेलेले दिवस बरे, पण 'नको हा सध्यांचा काळ' अशा तऱ्हेचे निराशाजनक उद्गार ते काढीत असत व त्यांस आमचे वडील स्पष्ट व सत्य असें उत्तर देत.

असो. वर्षापूर्वीची गोष्ट असेल. आमच्या गांवीं एक देशभक्त आले होते. राष्ट्रीय जागृती करण्याकरितां ते आले होते. त्यांचें सर्व व्याख्यान राजकीय विचारांनींच भरलेलें असल्याकारणानें "जे सध्यां आपत्तीचे दिवस आपणा भारतवासीयांस भोगावे लागत आहेत ते केवळ आपल्या राजकीय पारतंत्र्यामुळें; तेव्हां आपला देश स्वतंत्र झाल्याशिवाय आपणांस चांगले दिवस दिसणार नाहींत" वगैरे वगैरे ते म्हणाले.

त्यांच्या म्हणण्यांत तथ्यांश असला तरी आमच्या दारिद्र्यास पारतंत्र्य जितकें कारणीभूत आहे तितकीच आमची औद्योगिक, सामाजिक व धार्मिक अवनतिही कारणीभूत आहे असें माझें स्वतःचें मत आहे. नुसत्या एकाच हातानें केव्हांही टाळी वाजत नाहीं. आज राष्ट्र पारतंत्र्यांत आहे. उद्यां स्वराज्य मिळेल म्हणून काय लोकांचा शेतसारा देणें चुकेल. राजकीय क्रांतीमुळें खेडेगांवांतील लोकांच्या आयुष्यक्रमांत फारसा फेरबदल होणार नाहीं. ग्राम सुधारणेचा प्रश्न स्वराज्य मिळाल्यावर सुटणें जितका शक्य व सुलभ आहे. तितकाच तो आतांही आहे. नाहीं तरी ग्रामसुधारणा खेडेगांवच्या लोकांवर त्यांना सुखी करण्याकरितां कौन्सिलांत ठराव पास करूनच लादावयाची व ही गोष्ट सध्यांही शक्य आहे. ग्रामसुधारणेचा प्रश्न राजकीय सुधारणे-पेक्षां सामाजिक व औद्योगिक दृष्टीनें महत्वाचा आहे. म्हणूनच तो पक्षातीत आहे. ब्राम्हणेतर, सिंधी, कर्नाटकी, गुजराथी, कोंकणी, ख्रिश्चन, पार्शी, मुसलमान, मवाळ जहाल, कट्टर, स्वराज्यीष्ट, प्रति-सहकार किंवा तटस्थ अथवा राष्ट्रीय वगैरे कितीही पक्ष असले तरी असल्या बाबतींत ते आपले पक्षभेद खास विसरतील व ग्राम-सुधारणेची जर खरी तळमळ त्यांना लागली असेल तर सध्यांच्या कौन्सिलांतही इष्ट ती सुधारणा ते घडवून आणूं शकतील. त्याक-रितां स्वराज्य मिळण्याची वाट बघण्यास नको.

खेडेगांवांची सध्यांची वाईट स्थिति कौन्सिलांत पास केलेल्या ठरावाच्यामुळें सुधारणें जरी शक्य असलें; तरी पण ही झाली बाह्य सुधारणा. अंतस्थ सुधारणा ही प्रत्यक्ष खेडेगांवांत राहून

लोकांची मनें वळवूनच घडवून आणणें शक्य आहे. खेडेगांवांतील लोकांस एकदां त्यांची चूक दाखवून द्यावी. त्यांची खात्री पटवून द्यावी कीं, ही त्यांची चूक होत आहे. त्यांना इष्टसा सुधारणेचा मार्ग दाखवावा म्हणजे खेडेगांवांतील लोकच सुधारणा घडवून आणतात. प्रश्न काय तो गोष्ट पटण्याचाच आहे. आज औद्योगिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक बाबतींत त्यांची फार अवनति झाली आहे. त्या बाबतींत माझे स्वतःचे गांव हेंच प्रमाणभूत धरून प्रत्यक्ष निरीक्षणानें व अनुभवानें सध्यांच्या खेडेगांवांतील लोकांच्या दारिद्र्याच्या ज्या ज्या गोष्टी माझ्या दृष्टींस आल्या त्यांचें विवेचन करण्याचें मीं योजिलें आहे. स्वानुभवानेंच मी माझी मतें बनविलीं असल्याकारणानें ती कदाचित चुकीचीही असण्याचा संभव आहे. पण प्रस्तुत पुस्तकांत जें ग्राह्य असेल त्याचाच वाचकांनीं उपयोग करावा अशी लेखकाची विनंति आहे. तेवढ्यांतही स्वदेशबांधवांची अल्प सेवा केल्याचें समाधान लेखकांस वाटेल व इच्छित हेत अंशतः पूर्ण होईल. असो.

# औद्योगिक परिस्थिति.

आमच्या उद्योगधंद्याचे मुख्यत: दोन विभाग पडतात. एक शेती व दुसरा इतर धंदे, शेतीच्या बाबतींत आम्ही अजून गतानुगतिकच आहोंत. त्यामुळें पूर्वीच्या शेती करण्याच्या पद्धतींत व सध्यांच्या पद्धतींत बिलकूल फरक पडलेला नाहीं. इतर परिस्थिति बदललेली आहे. पण पूर्वापार पद्धतींत फरक न झाल्याकारणानें वर्षास एक पीक काढून परवडत नाहीं. पावसाची दुर्भिक्षता किंवा नद्या विहीरींचा अभाव ह्यामुळें दोन किंवा तीन पिकें काढणें शक्य नसेल पण ह्या अशक्यतेपेक्षां आळस हाही शक्यतेच्या आड येतो. आळस व अल्प संतुष्टता हे दोन दुर्गुण शेतीची सुधारणा घडवून आणण्याच्या आड येतात. साधारणपणें एक इसम पांच तें सात जोडीच्या शेतीची देखरेख करूं शकतो व ज्या इसमास इतकी शेती असेल त्यांस ती परवडतेही. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं हिंदु कायद्याप्रमाणें एकत्र कुटुंबांत मूल जन्मास येतांच एकत्र इष्टेटींत वाटेकरी होतें. त्यामुळें बापास पाच जोडीची शेती असली व त्यांस पांच मुलें असलीं तर वास्तविक कोणी तरी एक मुलगा तिची देखरेख करू शकला असता. पण प्रत्येक मुलास वाटते कीं काय करायचा आहे दुसरा उद्योग करून ? आहे वडिलोपार्जित शेती. आपलें पोट सहज भरेल. ही अल्पसंतुष्टता व हा आळस हींच ऱ्हासास कारणीभूत आहेत. बाप मेल्यावर मुलें फार थोडा काळ एकत्र रहातात;

नव्हे विभक्त होण्याची त्यांची अगदीं नैसर्गिक प्रवृत्तीच बनली आहे. प्रत्येकाचे वांट्यास एक एक जोडीची शेती येते. देखरेखीचा खर्च जर शेतीच्या इतर खर्चांत मिळविला तर खरोखर शेतींत कांहींच पिकत नाहीं. असें दिसून येईल. नोकरास जर वीस रु. दरमहा दिला जातो तर देखरेख करणाराचा निदान पन्नास तरी धरला पाहिजे. म्हणजे वर्षाचे सहाशें रु. देखरेखीचा खर्च होईल. शेतकरी चाळीस बिघे जमीन एका जोडीचे मदतीनें करूं शकतो व एका जोडीचे शेतीचे सर्व खर्च वजा जातां वार्षिक उत्पन्न पांच-सहाशें वर क्वचितच जातें. एक जोडीची शेती विकली तर दहा-हजार रुपये येतील व येवढी रकम बँकेंत टाकली तर ठेवीच्या भावानें चारशेंपांचशें रुपये व्याजाचे येतील. व शिवाय शेतीवाला इसम इतर उद्योगधंदा करण्यास मोकळा. म्हणजे इतर उद्योग करून जर तो पोट भरूं शकत असला तर व्याज हें शिलकेंतच पडेल व अशा रीतीनें त्याचें दारिद्र्य जाईल. सध्यांतरी नुसती देख-रेख करून तो आपले पोटच भरतो. लग्नकार्य करायचें झाल्यास त्याला सावकाराचीच भेट घ्यावी लागते. वरील विवेचनावरून सर्व लोकांनीं शेतें विकून बँकेंत पैसे टाकावे असा लिहिण्याचा उद्देश नसून एक जोडीचा शेती स्वतःच मजुरी केल्याशिवाय परवडत नाहीं हें दाखविण्याचा आहे. उलट पक्षीं माझें स्वतःचें मत निरालेंच आहे. पांच बंधु स्वभाववैचित्र्यामुळें एकत्र होणें शक्य नसेल तर निदान पांच मित्रांनीं शेतीपुरते एकत्र व्हावें, व शेतीची देखरेख एकाचे स्वाधीन करावी व चौघांनीं निरनिराळे धंदे करावेत. शेतीची देखरेख करणाराचें एकतर वेतन ठरवून टाकावें

अगर प्रत्येकानें पाळी पाळीनें देखरेख करावी. एकत्र कुटुंबानें विभक्त होण्याचे भरीस न पडतां एकाभावानें देखरेख करावी व इतरांनीं इतर उद्योग करावेत. येईल त्या उत्पन्नांतून देखरेखीबद्दल योग्य तो मोबदला त्या भावास काढून देऊन मग पैसे वांटून घ्यावे. अशा रितीनें सध्यांची वाईट स्थिति टळेल.

एका जोडीचे शेतीवाल्यास देखरेखीचें असें कांहीं फार काम नसत त्यामुळें त्याचा बराचसा वेळ फुकट जातो. व त्या वेळांत इतर उद्योगाची वृद्धि करण्याऐवजीं तो आळस वृद्धी मात्र करतो. ह्या रिकाम्या वेळांत त्याला कांहीं तरी उद्योग करतां येण्यासारखा आहे. खादीप्रचारक खेड्यापाड्यांतून हिंडून खादीप्रसारार्थ व्याख्यानें देतील अगर मुक्काम करतील तर खादीचा प्रसार फार झपाट्यानें होईल. गरीब कुटुंबें स्वावलंबी बनतील व सुखी होतील. कांग्रेसमध्यें अगर प्रांतिक अथवा जिल्ह्याच्या कांग्रेसकमिट्यांतून ठराव पास करून घेण्यापेक्षां ( कारण नुसते ठराव पास करतांना हीं वादांची रणें माजतात ) कर्त्या देशभक्तानें एकाद्या खेडेगांवींच स्थायिक व्हावें म्हणजे तो खेडेगांवची खरी सुधारणा घडवून आणूं शकेल. असो. आतां आपण शेतकऱ्याच्या आर्थिक अवनतीकडून औद्योगिक अवनतीकडे वळूंया.

शेतीच्या बाबतींत अजून आम्हीं गतानुगतिकच आहोंत हें मी प्रथम लिहिलेंच आहे. म्याकबेथ कंपनीची किंवा इतर कोणत्याही विदेशी कंपन्यांची सुधारलेलीं शेतीचीं आऊतें वापरणें हीच शेतीची सुधारणा असें निदान माझें तरी मत नाहीं. ट्रॅक्टर

किंवा इतर कोणतेंही यंत्र भारी किंमतीचें असणार. तेव्हां तें सध्यांच्या ( एक जोडीची शेती करणाऱ्या ) शेतकऱ्यास घेणेंच परवडणार नाहीं. अर्थात अशी डोईजड यंत्रें घेऊन तो त्यांचें व्याज तरी भरूं शकेल किंवा काय ह्याची शंकाच आहे. पाश्चात्य राष्ट्रांत शेतीच्या मोठ्या भांडवलांच्या कंपन्या आहेत. त्यांच्याजवळ शेती पुष्कळ असते तेव्हां त्यांना अशी यंत्रें घेणें परवडतें. त्या देशांत शिक्षणवृद्धि झाल्याकारणानें त्यांना जगांतील कोणत्याही देशांत जाऊन ज्ञानाचे जोरावर पोट भरतां येतें. अशा रितीनें देशांतील बरीचशी लोकसंख्या निरनिराळ्या देशास गेल्याकारणानें देशांत राहिलेल्या लोकांना मनुष्यबळाची उणीव यांत्रिक बळानें भरून काढावी लागते. अशा रितीनें देशांत राहिलेलेही उत्तम रितीनें पोट भरूं शकतात. हिंदुस्थानचें सर्वच कांहीं विचित्र. आमच्या देशासारखा अज्ञान देश दुसरा एखादा क्वचितच असेल. लोकांना परदेश गमन ' मजूर ' म्हणूनच करावें लागतें. देशाच्या लोकसंख्येच्या मानानें परदेशीं फारच थोडे लोक गेले आहेत. ह्यामुळें आमच्या देशांत मनुष्यबळाचा बिलकुल तुटवडा नाहीं. पण आमच्या सर्व गोष्टी जर पुढें यंत्रानें होऊं लागल्या तर आमच्यांत बेकारी वाढेल. ट्रॅक्टर पंचवीस जोड्यांचा खर्च वाचवीत असेल, पेरणीच्या यंत्रानें बीं आपोआप पेरलें जात असेल, कापणीच्या यंत्रानें मनुष्याची जरूरच भासणार नाहीं; पण हीं यंत्रें आमच्या देशांत सररहा उपयोगांत येऊं लागलीं तर ट्रॅक्टरच्या उपयोग करूं लागल्यामुळें बेकार झालेल्या चोवीस मजुरांची काय व्यवस्था लावायची ? पेरणीच्या यंत्रामुळें बेकार झालेल्या पांचसहा

मजुरांची काय सोय ? यंत्रें सुबक आहेत, टिकाऊ आहेत, झटपट काम देतात ह्या सर्व गोष्टी खऱ्या असतील. नाहीं असें नाहीं. पण प्रश्न स्वदेशाभिमानाचा, आपल्या देशाची अब्रू बचावण्याचा आहे. आजच आम्हीं दारिद्र्यांत आहोंत. आजच आमच्यांत अर्धपोटीं राहणारे लक्षावधि लोक आहेत आणि आजच आम्हीं स्वाभिमान-शून्यतेनें परदेशीं कंपन्यांस श्रीमंत करणार. भांडवलशाहीची वाढ म्हणजे देशांतील मध्यम व कनिष्ठ वर्गीतील लोकांच्या दारिद्र्याची वाढ. भांडवलवाल्यानें वाटेल तशा चैनी कराव्या व त्यांच्याच गिरणींत खपणाऱ्या मजुरांची पगारवाढ मात्र त्यांना करवत नाहीं अशी सद्यःस्थिती आहे. असो. शेतींत जर यांत्रिक सुधारणा होणार असेल तर अल्पप्रमाणावर भांडवलशाहीचीच वाढ होणार व गरीब-लोकांची अन्नान दशा होणार तेव्हां शेतींत सुधारणा घडवून आणणें म्हणजे सुधारलेली शेतीची आऊतें किंवा यांत्रिक सामान वाढविणें हें नव्हे हें वाचकांनीं नीटपणें लक्षांत ठेवावें. उलटपक्षीं त्यांना शेतीच्या औतांत सुधारणा करणें असेल तर स्वतःच्या बुद्धीनें एखादें नवीन तऱ्हेचें औत तयार करावें व ह्या कामीं गांवच्या सुताराची व लोहाराची मदत घ्यावी. त्यांचीही बिचाऱ्यांचीं पोटें भरतील.

आतां पिकासंबंधीं थोडेंसें लिहून हें शेतकीप्रकरण पुरें करितों. साधारणतः खान्देशांत कपाशी, ज्वारी, बाजरी, उडीद, मूग, मठ, कुळीद, तूर, हीं मुख्यतः खरीपाची पिकें होत. व गहूं हरबरा, जवस धणें हीं रब्बीचीं पिकें होत. रब्बीच्या पिकांत कांहीं नवीन धान्याची भर पडलेली नाहीं, पण पूर्व खान्देशांत रब्बीच्या पेऱ्याचें

प्रमाणही शेंकडा पांच दहाच असेल. तेव्हां त्याच्याविषयीं जास्त न लिहितां खरीपाच्या पिकासंबंधींच थोडेसें लिहितों. गेल्या वीस वर्षांपूर्वीं कपाशीस आतांइतका भाव नव्हता त्यामुळें पूर्वींच्या लोकांचे क्वचितच सरकी जास्त पेरण्याकडे लक्ष असे. त्यामुळें थोडीशी कपाशी पेरून ( साधारणपणें एक चतुर्थांश अथवा एक तृतियांश ) जो पैसा येई त्यांतून शेतसारा दिला जात असे. दोन तृतियांश धान्य पेरलें जात होतें त्यामुळें शेतकऱ्यांस पुरून उरेल इतकें धान्य होई व जनावरासही पुरेसा चारा होई. त्याकाळीं व्यापाराचीही फारशी वाढ न झाल्याकारणानें गरज भागवून उरलेल्या धान्यास त्याच्या खेडेगांवाशिवाय दुसरी बाजारी पेठ नसे. शेतकऱ्याला क्वचितच दुसरी पेठ बघावी लागत असे. शेती न करणारे ह्मणजे सोनार, सुतार, वगैरे लोक, किंवा स्वतःच्या मालकीची शेती नसणारे लोक हे धान्य खरेदी करीत असत. देवघेव अल्प प्रमाणावर असल्याकरणानें धान्याचे भाव वाढलेले नव्हते. त्यामुळें जिकडे तिकडे स्वस्ताई होती, व सुबत्ता नांदत होती. लोकांस पैसा कमी मिळत होता पण खर्चही कमी करावा लागत होता, त्यामुळें लोक सधन नसले तरी खाऊन पिऊन सुखी होते. थोडक्यांत सांगायचें म्हणजे लोक आतांच्यासारखे दरिद्री नव्हते. सुमारें वीस वर्षांपासून कपाशीस चांगला भाव येऊं लागला. परदेशी कंपन्याचें प्रस्थही आमच्या देशांत माजूं लागलें. त्यामुळें लहान सहान व्यापारी खेडोखेडीं हिंडत व कपाशी खरेदी करीत. व स्वाभिमानशून्यतेनें खुशाल परदेशी कंपन्यास थोडासा नफा घेऊन विकत. दिवसेंदिवस हा प्रकार वाढत्या प्रमाणावरच

आहे त्यामुळें कापसाचा भावही दुप्पट अडीचपट वाढला आहे. साधारणपणें ज्या धान्याचा भाव जास्त, त्याचा पेराही ज्यास्त होऊं लागतो. दिवसेंदिवस कापूस पेरण्याचें प्रमाण एक तृतियांशावरून निम्मे वर आले. शेतकऱ्यास पैसे मिळूं लागले. त्याबरोबर त्याच्या हळूं हळूं गरजाही वाढूं लागल्या. हंगामांत एक कपाशीची गाडी विकून त्याला चारशें साडेचारशें पर्यंत पैसे मिळूं लागले. साधारणपणें साल बरें आल्यास शेतकऱ्यास ( एक जोडीच्या ) हजारदीडहजारपर्यंत कापशी पिकूं लागली. पुढें चैत्रवैशाखांत एखादें लग्न कार्य असलें तर वाजवीपेक्षां जास्त खर्च होऊं लागला. कारण, हिम्मत अशी असें कीं झाले कर्ज म्हणजे फेडूं पुढच्या वर्षाच्या कपाशीमधून. लग्न कार्य करण्याचे वेळीं पैसा नसला तरी ह्या हिंमतीच्या जोरावर शेतकरी थोडेसें कर्ज काढण्यास मागें पुढें पहात नसे. कपाशिमुळें त्याची दृष्टी फांकली म्हणूनच तो पुढच्या घटकेचा यत्किंचितही विचार न करितां वाटेल तसा खर्च करूं लागला. पुढें मागें एखादें साल वाईट आलें म्हणजे त्याला सावकाराचे कज देतां येईना, नव्हें तो व्याज देखील देण्यास असमर्थ होई. अशा रितीनें त्याची व सावकाराची हळूहळू मैत्री जमूं लागली. आज माझ्या गांवांतील शेंकडा ऐंशी शेतकरी कर्जबाजारी आहेत. असो. कपाशी पेरण्याचें प्रमाण जसें वाढूं लागलें तसें इतर धान्यें पेरण्याचें कमी झालें. अर्थात धान्य आतां शेतकऱ्यास पुरेसेंच होऊं लागलें. चाराही गुरास कधीं कधीं खुटत असे. शेतकरी खेरीज करून इतर गांवच्या लोकांस शेतीचें धान्य ( विकत ) मिळेनासें झालें तेव्हां त्यांना शेजारच्या मोठ्या पेठेकडे

धांव घ्यावी लागली. पेठमध्यें धान्य रेल्वेनेंच येणार तेव्हां त्यावर व्यापाऱ्यांचा नफा, रेल्वेखर्च वगैरे बसणार, त्यामुळें धान्य महाग मिळूं लागलें. हळू हळु मजुरांनींही मजुरी वाढविली, इतर धंदेवाल्यांनीही आपले दर वाढविले. पूर्वीं दोन आणें शर्टची शिलाई असें आतां चार आणे सहा आणे झाली. अशा रितीनें पूर्वींची स्वस्ताई व सुबत्ता हळूहळू जाऊन त्याच्या जागीं महागाई व दारिद्र्याची झपाट्यानें वाढ होऊं लागली. "पूर्वीं व आतां" हा फरक लोकांस भासूं लागला. ह्या दारिद्र्यांत भर पाडण्यास आणखी एक गोष्ट कारणीभूत झाली. गेल्या तीन चार वर्षापासून आमच्या जिल्ह्यांत स्पॅनिश भुइमुगाचा पेरा फार वाढत्या प्रमाणावर आहे. कपाशीप्रमाणेंच याचा पैसा जास्त येतो व शिवाय याच्या पासून दुसरे दोन तीन फायदे आहेत. तज्ज्ञांचे मतें भुइमुगाचे मुळीला ज्या लहान गांठी असतात त्यांत नाइट्रोजन जास्त असतो म्हणून जमीनींत एकप्रकारचें खतच टाकल्यासारखें होतें. हें पीक बाजरीप्रमाणें अल्पकाळ टिकणारें आहे. त्यामुळें तें जमीनीचा जास्त कसही घेत नाहीं. व भुईमुगाचा पाला जनावरास पुरणपोळीसारखा आवडतो असें शेतकऱ्याचें मत आहे. शिवाय हें पीक कपाशीप्रमाणें जास्त पैसे देणारें आहे हें पर्वीं सांगितलें आहेच. भुईमूग असा बऱ्याच तऱ्हेनें फायद्याचा आहे म्हणून आज तीन चार वर्षांत त्याचा पेरा फार वाढला आहे. आजमितीस पिकांची पेरणी साधारणमानानें खालीलप्रमाणें आहे. कपाशी एकतृतियांश, भुईमुग एकतृतियांश, इतर धान्यें एकतृतियांश, कदाचित धार्मिक जागृतीमुळें आम्हां भारतवासीयांस उपवास एकादशीकरितां जास्त भुईमुगाची जरूर भासूं लागली तर हें प्रमाण एकतृति-

यांश वरून निम्मेवरही जाईल. सध्यां तरी भुईमुग हा धार्मिक भावनेपेक्षां स्वार्थी भावनेनेंच पेरला जात आहे. हिंदुस्तानांत आतां गिरण्यांची वाढ बरींच झाली आहे त्यामुळें थोडासा तरी कापूस आमच्या देशांत खपण्याची आशा आहे. पण भुईमूग परदेशालाच जातो. इतर धान्यांचा पेरा पूर्वीपेक्षां बराचसा कमी झाल्याकारणानें खुद्द शेतकऱ्यासही आतांशा धान्य विकत घ्यावें लागतें. जातीच्या शेतकऱ्यास स्वतःचें पोट भरण्याकरितां ज्वारी विकत घ्यावी लागते ह्यापेक्षां जास्त नालायकीची व शरमेची गोष्ट कोणती ? चाऱ्यासंबंधींही असेंच लिहावें लागेल. सोनगड, नवापूरकडच्या गवताच्या गांठी किंवा भोपाळ झांशीकडून कडबीच्या व्यागनस् आल्या नाहींत असें निदान गेल्या दोन तीन वर्षांत तरी झालें नाहीं. भुईमुगाच्या पाल्याचा जरी चाऱ्याप्रमाणें उपयोग करीत असले, आणि तो जरी जनावरांस 'पुरणपोळी' प्रमाणें असला तरी त्यांची नित्याची 'भाकर'च जर कमी झाली तर त्यांचे कसें धकेल. पुरणपोळी कांहीं पुरेशी पिकत नाहीं. पूर्वी शेतीपासून पैसा कमी मिळत होता. कारण कपाशी कमी पेरली जात होती. पण धान्य पुरेसें होतें, म्हणून लोक सुखी होते. आतां धान्य कमी पेरून जास्त पैसा देणारीं धान्यें पेरण्याकडे लोकांचें लक्ष जास्त आहे. पैसा हातांत येतांच तो तेव्हांच खर्च होऊन जातो. कारण पैसा पाहतांच मनुष्याची, ही वस्तु घे, ती घे वगैरे अत्यावश्य नसलेल्या वस्तु घेण्याची फाजलि हांव वाढते व धान्य अपुरें पडतें; जनावरास चारा खुंटतो. जवळ पैसा नाहीं आणि धान्य व चारा तर घेत-

ल्च पाहिजे अशा रीतीनें राहिलेल्या थोड्या पैशात शेतकऱ्यास कसें तरी दारिद्र्यांत दिवस काढावे लागतात. असो. आमच्या सध्यांच्या दारिद्र्याचीं कारणें मी माझ्या समजुतीप्रमाणें नमूद केलीं आहेत. दारिद्र्य टाळणें म्हणजे ज्या कारणांमुळें दारिद्र्य आलें आहे तीं कारणें टाळणें हा अगदीं साधा उपाय. तेव्हां माझ्या शेतकरी बंधूंस माझें म्हणणें पटत असेल तर त्यांनीं वरीलप्रमाणें करावें, म्हणजे त्यांचें दारिद्र्य हळू हळू जाऊन त्यांना पूर्वींचे सुखाचे व सुबत्तेचे दिवस येतील. मनुष्य आपल्या गरजा भागवूं शकला म्हणजे बाहेर जगांत महागाई असो किंवा स्वस्ताई असो. इतरापेक्षां शेतकरी जास्त स्वावलंबी असतो म्हणूनच तो इतरापेक्षां आपलें दारिद्र्य लवकर घालवूं शकेल.

शेतकी सुधारणेचा आणखी एक उपाय आहे. शेतकऱ्यांनीं आपला देहस्वभाव ( गतानुगतिकत्व, व किंकर्तव्यमूढता ) सोडला पाहिजे. आपल्या शेतीपैकीं एक बिघा तरी जमीन निराळी राखून ठेवावी व आपल्या बुद्धीस अनुसरून सालाच्या काठीं एखादा तरी नवीन प्रयोग करून बघावा.

निरनिराळीं धान्येंच एका ठिकाणीं पेरून बघावीं. अगर खताचे निरनिराळे प्रकार करून बघावेत. निरनिराळ्या धान्यास निरनिराळें खत घालून बघावें. थोडक्यांत सांगायचें, म्हणजे आपल्या बुद्धीस येईल तसे प्रयोग करून बघावेत. प्रयोग करतांना लहान लहान टिपणेंही घेऊन ठेवावींत. प्रयोग यशस्वी झाल्यास सर्व शेतकरी बंधूंना सप्रमाण माहिती द्यायला सांपडेल. प्रयोग अयशस्वी झाला

तर नुकसानही फारसें होणार नाहीं. ह्या शोधन करण्याच्या प्रवृत्ती-बरोबरच प्रदर्शनाची वाढ झाली पाहिजे. नाहींतर त्यांच्या प्रयोगाला दुसरें कार्यक्षेत्र कोणतें शेतकऱ्यांनीं केलेले प्रयोग प्रदर्शनाचे वेळीं त्यांना दाखवितां येतील व अशा रीतीनें सर्व शेतकऱ्यांचा फायदा होईल. प्रदर्शनांत उत्तम तऱ्हेचे बीं, उत्तमपैकीं कापूस निरनिराळ्या तऱ्हेचीं आऊतें, निरनिराळे खतांचे नमुने वगैरे गोष्टी ठेवाव्यात. ज्याचें बीं उत्तम असेल त्याचेंच सर्वांनीं वापरावें. म्हणजे इतरांचा फायदा होईल. त्या शेतकऱ्यास उत्तेजनार्थ बक्षीसही द्यावें. व्यवस्थापक मंडळानें ज्यांचे प्रयोग पसंत केले असतील त्यांना ते करून दाखवावयाची अगर तत्संबंधीं गोळा केलेली माहिती अगर निबंध वाचण्याची परवानगी द्यावी म्हणजे एकाच्या ज्ञानाचा फायदा बहुजन समाजासही घेतां येईल. अशा तऱ्हेचे प्रयोग करणाऱ्यास असलीं प्रदर्शनेंच जास्त उत्तेजनपर होतील, तेव्हां वर्षाच्या काठीं निदान एक तरी प्रदर्शन भरविलें पाहिजे. शेतकीच्या त्रैमासिक सभाही भरविण्यांत याव्यात; व त्या त्या दिवसांत शेतीची जी परिस्थिति असेल त्याबद्दल नीट वादविवाद करण्यांत यावा.

शेतकी सभांमध्यें झाडावरची कीड घालविण्याचे उपाय, गुरांचे रोग घालविण्याचे उपाय ह्याबद्दलही नीट वादविवाद करावा व कांहीं उपाय सर्वानुमतें ठरवावेत. अशा त्रैमासिक सभा भरविण्यांत शेतकी खात्याच्या अधिकारी वर्गानेंच पुढाकार घ्यावा व आपल्या ज्ञानाचा शेतकरी वर्गास फायदा

द्यावा अशा रीतीनें शेतकऱ्यांनीं प्रत्यक्ष अनुभवानें मिळविलेलें ज्ञान व सुशिक्षित अधिकाऱ्यांनीं वाचनानें व शिक्षणानें मिळविलेलें ज्ञान ह्या गंगायमुना व त्यांस येऊन मिळणारी श्रोत्यांची सरस्वती असा त्रिवेणी संगम ह्या त्रैमासिक सभारूपी प्रयाग क्षेत्रीं होत जाईल. त्यापासूनही शेतकऱ्यांचा पुष्कळ फायदा होईल. ह्या सभा व प्रदर्शनास जोडून शेतकीसंबंधानें लायब्रीही स्थापन करावी. शेतकी सभा, शेतकी प्रदर्शन, शेतकी, वाङ्मय ह्यामुळें शेतकऱ्यांची सर्वांगीण प्रगति होईल, सर्वसाधारण सुधारणा होईल व सांपत्तिक स्थिति सुधरेल व आजचें दारिद्र्य टळेल.

शेतीचें जनावरें हें एक महत्वाचें अंग आहे. तेव्हां शेतकी प्रदर्शनाबरोबर गुरांचें प्रदर्शनही भरवावें. जो शेतकरी जनावरें उत्तम ठेवील, त्याला उत्तेजनादाखल योग्य तें पारितोषक द्यावें. म्हणजे इतर शेतकरीही आपलीं जनावरें चांगलीं ठेवूं लागतील. ज्यांच्या जोरावर शेती करायची त्या शिव वाहनांची किंवा गोमाता अगर म्हशींची स्थिति सुधरेल. असो. शेती सुधारणा प्रकरण येथें पुरे करतों.

# इतर धंदे.

ग्रंथ
नोंद नं.
ता

एक वेळ शेतीवाले बरे पण आज उद्योग धंद्यावाल्यां इतकी वाईट स्थिति खेडेगांवांत दुसरें कोणाचीही नसेल. उद्योग धंद्यांची वाढही मनुष्याच्या गरजेच्या वाढीवर अवलंबून असते. मनुष्याच्या गरजा वाढल्या म्हणजे त्या भागविण्यासाठीं निरनिराळे उद्योग धंदे अस्तित्वांत येतात. पूर्वीच्या काळीं लोक वल्कलें नेसत असत, त्यावेळीं खादी किंवा मिलची बिलकुल जरूर नव्हती त्यामुळें ह्या धंद्याची वाढ त्या काळीं बिलकुल झाली नाहीं. पूर्वी लोक कंदमुळें खात, त्यामुळें त्या काळीं शेतीच्या धंद्याची वाढ बिलकुल झाली नव्हती किंवा फ्लोअरमिल्स अथवा 'बेकरीज' ही निघाल्या नव्हत्या. मध्य युग हें प्राचीन युगापेक्षां जास्त सुधारलेलें होतें, पण त्या काळीं लोक चहा पीत नव्हते म्हणून कपबशांचा धंदा अस्तित्वांत आला नव्हता. पूर्वीचे लोक अगदीं सृष्टि क्रमाप्रमाणें (according to Nature) रहात असत त्यामुळें त्यांच्या गरजा सृष्टिदेवताच पुरवीत असे. मानवी उद्योगधंद्यांना तेथें वावही नव्हता.

देवाच्या ह्या अवाढव्य कारखान्यापुढें मानवी उद्योग धंद्यांचा काय पाडाव? पण ह्या स्थितीस रानटी अवस्था म्हणतात. दिवसेंदिवस आम्ही ह्या स्थितीपासून सुधारणेच्या मार्गाला लागलो आहोंत. ह्मणजे सृष्टिदेवतेवर अवलंबून रहाण्याऐवजीं आम्ही आमच्या गरजा वाढविल्या आहेत. सृष्टिदेवता

आतां आमच्या गरजा भागवूं शकत नाहीं; कारण त्या आतां निराळयाच प्रकारच्या झाल्या आहेत. दिवसेंदिवस आमच्यांत सुधारणा होत आहे म्हणजे दिवसेंदिवस आमच्या गरजा वाढत्या प्रमाणावर आहेत. पूर्वी लोक पायीं प्रवास करीत असत, नंतर घोडा अगर बैलानें म्हणजे पूर्वीपेक्षां घोडा जलद. त्यानंतर आगगाडी, मोटार आली व आतां तेही अपुरें वाटूं लागले आहे म्हणून विमानें उत्पन्न झालीं. आतां इंग्लंड अवघ्या चार दिवसांत गांठता येईल. बुद्धीस स्वैर गती देऊन निरनिराळ्या गोष्टींचा शोध लावायचा, जिकडून ज्यास्त सौख्य मिळेल त्या गोष्टी तयार करायच्या म्हणजे लोकांना त्या गोष्टींची गरज भासूं लागते. व अशा रीतीनें सुधारणा घडून येते. लोक दिवसेंदिवस सुशिक्षित होत आहेत. दिवसेंदिवस आपल्या बुद्धीप्रमाणें ते निरनिराळे शोध लावीत आहेत. दिवसेंदिवस लोकांच्या गरजा वाढत आहेत व सुधारणेचें पाऊल पुढेंच पडत आहे. आतां आम्हीं वल्कले नेसूं अशी कल्पना स्वप्नीं देखील येणार नाहीं. अशी सर्व साधारण जगाची स्थिति आहे.

सुधारलेल्या देशांत लोकांच्या गरजा व उद्योगधंद्याची वाढ ह्यांचें पाऊल बरोबर पडत आहे, तर आमच्या देशांत आमच्या गरजा व परदेशी उद्योगधंदे ह्यांचें पाऊल बरोबर पडत आहे. राजकीय पारतंत्र्यामुळें म्हणा अगर इतर पुष्कळशा गोष्टींमुळें म्हणा आमच्या देशांतच उद्योगधंद्यांची वाढ झाली नाहीं, पण

लोकांच्या गरजा मात्र वाढल्या. मँचेस्टर श्रीमंत व्हावें म्हणून डाक्क्याच्या कारखानदारांची बोटें तोडण्यांत आलीं वगैरेसारख्या पुष्कळ गोष्टीमुळें आम्ही फार मागसलेले आहोंत. सर्वसाधारण देशाचीच अशी स्थिति मग खेडेगांवाबद्दल जास्त काय लिहायचें ? उद्योगधंद्याची योग्य ती वाढ न झाल्याकारणानें आमच्या खेडेगांवांतील धंदेवाल्यांची सध्यां उपासमार होण्याची वेळ आली आहे.

मनुष्यप्राणी सुधारणाप्रिय आहे. दिवसेंदिवस त्याच्या गरजा वाढत्या प्रमाणावर आहेत. पण आमच्या धंदेवाल्यांनीं त्यांच्या गरजा भागविण्याचा थोडा देखील प्रयत्न केलेला दिसत नाहीं. किंवा नवीन गोष्टी करण्याची त्यांचे ठिकाणीं आवडच नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा रितीनें खेडेगांवांतील धंदेवाले व लोक ह्यांचा मेळ न बसल्याकारणानें बिचारे अगदीं ठार मेले आहेत. प्रस्तुत प्रकरणांत खेडेगांवांतील एक एक धंदा घेऊन त्यावर दोन शब्द लिहावयाचे योजिलें आहे.

**सोनार**—लोकांच्या दारिद्र्यावस्थेमुळें ह्याचा धंदा बराच मंदावला आहे. लोकांची आवड अजून विशेष बदललेली नाहीं. त्यामुळें हा लोकांच्या गरजा भागवूं शकतो. पण नवीन कांहीं करून दाखवून लोकांची मनें आकर्षण्याची कल्पकता ह्याचें ठिकाणीं नाहीं. स्वतःचा बुद्धिरूपी डागिना हा जोंपर्यंत बनवूं शकत नाहीं तोपर्यंत हा पोट तरी कसें भरणार ?

**लोहार**—हा नवीन सुधारणेस टक्कर देऊं शकत नाहीं.

आजकाल लहानशा खिळ्यापासून तो बीम्स पर्यंत सर्वच कांहीं विदेशी त्यामुळें ह्याच्या कल्पकतेस वाव नाहीं, व ह्याचे ठिकाणीं उत्साह नाहीं. अशिक्षितपणा व अज्ञान ह्या कांटेरी कुंपणानें त्याच्या प्रगतीचा मार्गच खुंटवून टाकला आहे. साध्या ठोक ठाकीचे काम करितो व कसें बसें पोट भरतो. तापलेल्या लोखंडास घणाचे ठोके देऊन हा जसा आकार देऊं शकतो तसा अझून स्वतःच्या बुद्धीस व कल्पकतेस परिस्थितीच्या घणाचे इतके ठोके पडत आहेत तरी देऊं शकत नाहीं म्हणूनच हें त्याचें दारिद्य्र त्याला सोडीत नाहीं.

**कासार**—१–भांड्याचा व्यापार करणारा–मोठ्या पेठेंतून भांडीं आणायचीं व थोडासा नफा घेऊन विकायचीं. लोकांच्या दारिद्य्रामुळें हाही व्यापार मंदावला आहे. कारण पितळेची भांडी कांहीं नेहमीं नेहमीं फुटत नाहींत. ह्याचेंच नशीब फुटकें दुसरें काय ?

२–नवीन भांडी तयार करणारा व मोड तोड करणारा तांबटकर–हे धंदे खेड्यापेक्षां सर्व दृष्टीनें शहरांत चालविलेलेच परवडतात.

३–बांगड्या भरणारा–बांगड्या भरणें व किरकोळ स्टेशनरी विकणें हे दोन धंदे हा कारितो. एकीकडचा माल आणून दुसरीकडे विकणें एवढेंच काम त्याला आहे. पण ह्या नुसत्या दलालीवर पोट भरत नाहीं. साबण करणें, बटनें बनविणें वगैरे सारख्या लहान गोष्टी तो करील तर आपली स्थिति खास

दा. क्र. 3038

सुधारील. तसेच परदेशी वस्तूपेक्षां देशी वस्तू शक्य तितक्या विकील तरीही देशाचा पुष्कळ फायदा होईल. ह्याचे बाबतींत लोकांच्या गरजा फार वाढल्या आहेत त्यामुळें ते शहरांतील मोठ्या दुकानदाराकडूनच त्या भागवितात. म्हणून त्याचें पोट भरण्यास मारामार पडते व बिचारा इतरास जसा बांगड्या भरतो तसाच स्वतःला देशाच्या उद्योगधंद्यांत भर टाकतां येत नाहीं म्हणून बांगड्याच घालून बसला आहे.

**शिंपी व न्हावी**—ह्या दोघांनीही परिस्थितीप्रमाणें आपल्या धंद्यांत फरक केला आहे. त्यामुळें तें बऱ्या रीतीनें पोट भरूं शकतात. शिंप्याचा धंदा आतां जातिविशिष्ट नाहीं एवढी एकच गोष्ट धंद्याच्या उन्नतीचें दर्शक आहे.

**सुतार**—लोकांच्या गरजा शेतीविषयींच आहेत. व त्या हा भागवूं शकतो. पण महागाईमुळें कसेंबसें पोट भरूं शकतो.

**कुंभार**—लोकांच्या गरजा वाढत्या प्रमाणावर आहेत. पण ह्याचे आपले जुनेच. लोणच्याची बरणी किंवा चहाची कपबशी किंवा अशाच इतर गोष्टी ह्या आम्हांस परदेशी घ्याव्या लागतात त्या ह्यामुळेंच. जें मातीचें मडकें हा पिढ्यानपिढ्या बनवीत आला आहे तद्वतच ह्याचें डोकें कल्पकतेच्या अभावीं झाले आहे, म्हणून त्याला पोट भरण्याची पंचाईत पडत आहे.

**कोष्टी**—मिलच्या वाढीमुळें ह्यांचे धंदे पार बुडाले आहेत.

**चांभार**—लोकांची प्रवृत्ति आतां विदेशी फॅशनचे जोडे

वापरण्याकडे जास्त आहे. पण ह्याला तर ते बनवितां येत नाहींत. हा फक्त जुन्या तऱ्हेचेच जोडे तयार करितो किंवा फाटक्या जोड्यास ठिगळ जोडतो नशीब फाटकें दुसरें काय ?

असो. साधारणपणें खेड्यांत वरील धंदे चालतात.

**व्यापार**—खेडेगांवांतील व्यापाऱ्याचे दोन विभाग पडतील. एक वाणी व दुसरे कापड व्यापारी. दोघांचेही व्यापार बरे चालतात. पण लोकांच्या गरजांकडे लक्ष पुरवितांना कापड व्यापाऱ्यानें स्वदेशीकडेही जरूर लक्ष पुरवावें. मँचेस्टरचा कपडा न खपविणें हें सर्वस्वी ह्याचे स्वाधीनची गोष्ट आहे. लोकांस हाच कपडा आवडतो म्हणून आम्हीं आणतों त्यापेक्षां नुकसान झालें तरी हरकत नाहीं पण लोकांची मनें स्वदेशीकडे वळविण्याचें काम हा करील तर ती देशसेवाच होईल.

परिस्थितीशीं टक्कर देतां येत नाहीं, ही एक गोष्ट जरी उद्योग धंदेवाल्यांच्या दारिद्र्यास कारणीभूत असली तरी त्यांचें दारिद्र्य आणखी एका गोष्टीमुळेंही टळणें शक्य नाहीं.

आमचे धंदे जे जातिविशिष्ट आहेत ते अगदीं उत्तम आहेत. व त्याच्या पुष्ट्यर्थ मानसशास्त्राचा ( Psychology ) आधार देण्यांत येतो. जातिवैशिष्ट्यामुळें अमुक एक धंदा पिढ्यान् पिढ्या अमुक एक जातीकडेच आहे. तेव्हां पूर्वजांच्या अंगचे गुण पुढच्या पिढींत आपसूकच उतरतात. जन्मतः असणाऱ्या प्रवृत्ति ( Congenital tendencies ) व स्वबुद्धिकौशल्य

ह्याचे जोरावर सुतार जितके नकशीचें काम करूं शकेल किंवा सोनार उत्तम डागिना बनवूं शकेल तसें एखाद्या उत्तम चांभारास उत्तम कपडे शिवतां येणार नाहींत किंवा लोहारास उत्तम विणतां येणार नाहीं. " जेणो काम तेणो थाय बिजा करे सो गोता खाय " ही म्हण पडली तीही ह्यामुळेंच ! वर लिहिलेल्या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी पण त्यांचा अतिरेक होऊं नये. कासाराच्या मुलानें दुसरा धंदा करूंच नये असें कांहीं नाहीं. सध्यांची स्थिति अशी झाली आहे कीं, आजा कापडाचा व्यापारी होता पुढें त्याला तीन मुलें झालीं. तेही तोच धंदा करूं लागले. पुढें त्या तीन व्यापाऱ्यांस प्रत्येकीं तीन तीन मुलें झाली. अशा रितीनें तीस पस्तीस वर्षांपूर्वीं ज्या खेड्यांत एक कापडाचा व्यापारी उत्तम रितीनें पोट भरूं शकत होता त्याच खेड्यांत आतां नऊ व्यापारी झाले आहेत. *

लोकसंख्येंत कांहीं इतकी वाढ झाली नाहीं. ह्यामुळें कोणाचेंच पुरतेपणीं पोट भरत नाहीं. त्यापेक्षां सर्वांनीं मिळून गांवच्या गरजेप्रमाणें एकच दुकान चालवावें अगर असेल तो धंदा करावा. शेअरस् काढून दुकान काढावें. व कोणी तरी एकानें तें चालवावें. धंदा अर्थात किफायतशीर चालेल. वाटेल त्यास शेअर खरेदी करितां येतील. व सर्वांस फायदा होईल.

---

* हें मी उदाहरणापुरतेंच गृहीत धरलें आहे. लिहिण्याचा उद्देश एवढाच कीं पुष्कळ वेळां धंदा तितकाच असतो व धंदेवाले वाढतात.

दहा दुकानदारांची विक्री एका दुकानापेक्षां केव्हांहीं कमीच असणार. अर्थात विक्रीप्रमाणें प्रत्येकाची खरेदी असणार, व कमी खरेदीवर त्यांना नफाही कमीच मिळणार, कारण त्यांना माल स्वस्त मिळणार नाहीं. उलट पक्षीं शेअरसूचे असें एकच दुकान असेल तर त्याची खरेदी मोठी असणार म्हणजे त्यांना थोडासा नफा घेऊन स्वस्त दरानें धान्य अगर कापड लोकांस देतां येईल, व अशा रितीनें गरीब शेतकऱ्यांचा पुष्कळ फायदा होईल. व सध्याचें दारिद्र्य टळूं लागेल.

# खेडें व खादी.

पांच शेतकऱ्यांनीं एकत्र शेती करून एकाचे स्वाधीन व्यवस्था लावावी; चौघांनीं इतर उद्योग करावेत. दहा दुकानदारांपैकीं सर्वांनीं मिळून एकच दुकान ठेवावें, व व्यवस्था एकाचे स्वाधीन करावी व नऊ जणांनीं इतर कांहीं करावें वगैरे मार्ग मी सध्यांचें दारिद्र्य घालविण्याकरितां सुचविले आहेत. पण ह्या चार शेतकऱ्यांनीं किंवा नऊ दुकानदारांनीं उद्योग तरी काय करायचा ? कां आपणास पैसा प्रयास न करितां मिळणारच आहे तेव्हां कांहीं उद्योग करून काय करायचे असें म्हणून आपला काळ उद्योगवृद्धिपेक्षां आळसवृद्धि करण्यांत घालवायचा हा एक प्रश्न आहे. वास्तविक ते करीत असलेल्या धंद्यांत त्यांची जरूर नव्हती मग आळसांत काळ घालविण्यापेक्षां उद्योगवृद्धिकरितां वरील मार्ग सुचविला होता. पण उद्योग करावयाचा तरी कोणता ? आपलें सर्व बाजूनीं हातपाय बांधले गेल्या कारणानें आम्हाला कार्यक्षेत्र फारसें उरलेलेंच नाहीं. ह्याला मुख्य कारण आमचें दारिद्र्य व शिक्षणविषयक मागसलेली स्थिति हें होय. ह्या रिकाम्या राहिलेल्या लोकांनीं जर चरखा फिरविण्याचें मनांत आणलें तर तें त्यांना सहज जमेल, नाहीं तरी एरव्हीं सकाळीं शेकोटी जवळ किंवा दुपारी कांहीं कांहीं घरीं गप्पा पत्त्यांचे अड्डे तर जमलेलेच असतात. तेथेंच चरखे ठेवले तर गप्पागोष्टी

होतील व खादीची निपजही मोठ्या प्रमाणावर होईल, ह्यापेक्षां ह्या रिकाम्या लोकांस दुसरा चांगला उद्योगच नाहीं. खादी ह्या शब्दाची उत्पत्तीच मोठी मजेची आहे. खायाला देते ती खादी व खेड्यांत होते ती खादी. कारण खेडें आणि खादी ह्या दोन शब्दांत मात्रा भेदाशिवाय विशेष फरक—ह्यान्ही शब्द इंग्रजींत लिहिले तर—नाहीं. ( khadi–khede ) जी खेड्यांत होते व जी खेड्यांतील लोकांना खायाला देते ती खादी. ह्यावरूनच पोट भरण्यासाठीं, सध्यांचें दारिद्र्य टाळण्यासाठीं, देशास सुखी करण्यासाठीं, स्वतः स्वावलंबि बनण्यासाठीं, खेड्यांतील लोकांनीं काय करावयास हवें हें सांगण्याची जरूरच भासत नाहीं. खेडेगांवांतील लोकांच्या सौख्यरवीला सध्यां दारिद्र्यरूपीं काळ्या कुट्ट ढगांनीं झांकलें आहे त्यास खादीरूपी पवनगतिशिवाय कोण दूर करूं शकेल ? थोडक्यांत लिहायचें म्हणजे खादी हेंच आमचें मोक्षसाधन आहे. तरी खेडेगांवांतील लोक जर खादीचा प्रसार करतील तर आपलें दारिद्र्य टाळतील. असो हें बरेंच वाढलेलें प्रकरण येथेंच संपवितों.

# शेतकरी सावकार व पैसा.

खेडेगांवच्या दारिद्र्याबद्दल लिहितांना सावकाराबद्दल न लिहिणें म्हणजे एकाद्या विद्यार्थ्यानें परीक्षेस जातांना लेखनाचें साहित्य न नेण्यासारखेंच होणार आहे. एक काळ असा होता कीं, शेतकरी वर्ग अडाणी व साधा भोळा होता. सावकार लोकांनीं ह्याचा फायदा घेऊन पुष्कळवेळां लबाडीनें कुळास नाडलें. ह्या लबाडीच्या ज्या गोष्टी सांगण्यांत येतात, त्या खऱ्या असल्या तरी विश्वासनीय वाटत नाहींत. पूर्वीचे सावकार लोक खरोखरच असे होते काय ह्याबद्दल साश्चर्य शंका येते. आज हा काळ पालटला आहे. लोक पूर्वींपेक्षां पुष्कळ शहाणे झाले आहेत. आतां पूर्वींसारख्या गोष्टी घडणें शक्य नाहीं. पण त्यामुळें एक गोष्ट मात्र निष्पन्न झाली आहे. परस्पर प्रेम अजिबात कमी होत चाललें आहे. सावकारानें प्रथम प्रथम कुळास पैसे लागतील तितके द्यावे. पाहून घ्यावें कीं, आतां कर्ज इष्टेटीबरोबर झालें आहे. मग पैशाची निकडीची मागणी करावी. अथात शेतकऱ्यास शेती विकण्याशिवाय गत्यंतरच नसतें. ह्या बाबतींत सावकारास दोष देण्यापेक्षां मी कुळासच अधिक दोष देईन. आपल्या स्थितीप्रमाणेंच कर्ज काढावयाचें सोडून केवळ पोकळ नांवलौकिकाकरितां लग्न मौंजीप्रसंगीं किंवा अन्य अशा कारणानें त्यानेंच पुढील कांहीं विचार न करितां कर्ज वाढविलें. सावकारास काय, तो आपल्या फाय-

द्याकरितां देणारच. अशा रीतानें कांहींसे कुळाच्या अजागळ-पणामुळें, कांहींसें सावकाराच्या लबाडीमुळें कित्येक शेत-करी धुळीस मिळाले आहेत. असो. सरकारास शेतक-ऱ्यांची कींव आली. व सावकाराच्या कृतीस आळा घाल-ण्याकरितां "दक्षिणी शेतकरी कायदा" काढला. त्यामुळें शेतकऱ्याची जमीन खरेदी न केली जातां कर्जाचे हप्ते पडूं लागले. दिलेलें कर्ज हप्त्या हप्त्यानें मिळूं लागल्यामुळें सावकारांचें नुकसान होऊं लागलें. त्यावर त्यांनीं एक तोड अशी काढिली कीं, ते कुळास हजार रुपये कर्ज देतात व दीड हजार लिहून घेतात. म्हणजे कुळानें गुण्या गोविंदानें मुदतींत पैसे दिले तर हजारच घेतात, व तसें न देतां कोर्ट दाखविलें तर दीडपट रकम वसूल करितात म्हणजे हप्ते पडले तरी त्यांचें नुकसान होत नाहीं. आपणास दीडपट रकम द्यावी लागेल ही भीति कुळानें बाळगिली. व सावकाराचे पैसे वेळेवर दिले तर तें उत्तमच आहे. कारण त्याला वक्तशीरपणाचें वळण लागेल. सावकार, कुळास ह्या काव्यानें वक्तशीरपणाचा सद्गुण शिक-वितो ह्याबद्दल कुळानें सावकाराचे आभार मानावे तितके थोडेच. पण परिस्थितीच्या अभावी कुळास आपला वक्तशीरपणा दाख-विण्याची संधीच येत नाहीं. शेतकऱ्याची पैशाची घडी जी एकदां बिघडली आहे ती कायमचीच. त्यामुळें त्यास पुष्कळ वेळां ही दीडपट रकमच भरावी लागते. अशा रीतीनें कित्येक शेतकरी धुळीस मिळाले आहेत व मिळत आहेत. सावकारांनीं

ह्या बाबतींत सदयता दाखविली तरच पुष्कळशी स्थिति सुधरेल. वाढलेले व्याजाचे दर कमी करून अडचणींत असलेल्या कुळास त्याच्या अडचणीचा फाजील फायदा न घेतां योग्य तोच व्याजाचा दर सावकारानें घ्यावा, म्हणजे पुष्कळ स्थिति सुधरेल. नाहींपेक्षां ह्या बाबतींत सुधारणा घडवून आणणें म्हणजे प्रत्येक खेडेगांवांत एक सहकारी पतपेढी स्थापन करणें ही होय. आजमितीस जेवढे म्हणून धनको असतील त्यांनीं आपली कर्जाऊ दिलेली रकम व शिलकी रकम ठराविक शेअरस्च्यारूपानें बँकेंत जमा करावी व ठेवीचे व्याज घेऊन ह्या कुळाच्या कट-कटींतून कायमचे मोकळे व्हावे व सुखांत आपले दिवस घाल-वावेत. आज जे सावकारास लुच्चा, लबाड, अनीतिमान्, निर्दयी, पाषाणहृदयी वगैरे दूषणें देतात त्यापासूनही तो अलिप्त होईल. शिवाय आज पुष्कळ लोक चोरांच्या भयास्तव आपल्या जवळ पैसे आहेत हें कोणाच्या नजरेस पडूं नये म्हणून रुपये जमीनींत पुरून ठेवतात, त्यांनाही पतपेढी हें निर्भय स्थानच होईल. शिवाय पैशाचें व्याज येईल ते निराळेच. किंवा एकाद्या गरीब इसमाजवळ एकाद्या शेअर इतके पैसे असले तर त्यालाही ते बँकेंत ठेवतां येतील. अशा रीतीनें सर्वांस बँक हें एक आपल्या पैशाचें निर्भय स्थान होईल. बँकेचा व्यवहार आम्हांस अपरिचित नाहींच. सध्यां आमच्यांत क्रेडिट सोसायटीज आहे-तच. बँकांचा व्यवहार त्याप्रमाणेंच चालवावा. सहकारी पतपेढी ह्या विषयावर स्वतंत्र रीतीनें किती तरी

लिहितां येण्यासारखें आहे. व पुष्कळसें लिहिलेंही गेलें आहे आतां नुसती कल्पना सुचविण्यापलीकडे मी जास्त कांहीं करीत नाहीं. बँकेंत सर्व कुळास सारखाच व्याजाचा दर लाविला जाईल त्यामुळें त्यालाही बरें पडेल. असो. थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे सहकारी पतपेढीमुळें लोकांची सध्यांची आर्थिक परिस्थिति सुधरेल, सर्व व्यवहार सचोटीनें चालतील व त्यांचें दारिद्र्य हळू हळू टळेल.

# धार्मिक परिस्थिति.

आमच्या दारिद्र्यास ज्या कांहीं गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत, त्यांत आमचे लग्नमौंजी सारखे धार्मिक विधी ह्यांचाही समावेश केला पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रांत लग्नविधी ही एक महत्वाची बाब समजली जात नाहीं. त्यामुळें त्याकरितां खर्चही फारसा होत नाहीं अशा रीतीनें द्रव्य थोडें खर्च करून ते लोक अतुल सौख्याचा अनुभव घेतात. तर आमच्याकडे सर्व इष्टेटीचाही होम करून मिळावें तितकें सुख मिळत नाहीं तें नाहींच. लग्नप्रसंगीं खर्च करितांना आम्ही मागचा पुढचा बिलकुल विचार करीत नाहीं. त्यामुळें लग्नविधि चालू असतांना आम्ही जे कांहीं थोडे दिवस आनंदांत घालवितों त्यानंतर आमरण पैशाच्या चिंतेचें पिशाच्च आमच्या पाठीस लागतें. आनंद व दुःख ह्यांचें मिश्रण दुसरें कोणतें असणार ? दारू वगैरे सारखीं व्यसनेंही दारिद्र्याचे आगामी दूत आहेत तेव्हां तीं टाळणें हें वाचकास सांगणें नलगे.

**भिक्षेकरीः**—अशी एक म्हण पडली आहे कीं, इंग्रजी राज्यांत काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत बिनधोक जातां येतें. ह्यांत तथ्यांशही असेल, पण प्रश्न एवढाच आहे कीं, आमच्याजवळ आतां सोनें आहे कां ? दिवसेंदिवस आमचें दारिद्र्य वाढत्या प्रमाणावर आहे. दिवसेंदिवस आम्हीं भिकारी होत चाललों आहोंत. मग आम्ही दुसऱ्यास काय भिक्षा घालायची ? दारापुढें भिकारी, बारा वाजतां घरीं अतिथी, किंवा आग

गाडीच्या डब्यांतील आंधळ्याची माळ पाहिली म्हणजे दुष्काळांत तेरावा महिना वाटतो. बरें त्यांतून दानधर्म करायचा तो तरी कोणाला ? खेड्यांतल्या भिकाऱ्यांची सरासरी काढली तर जवळ जवळ चार भिकारी धट्टेकट्टे असतात. व एकादा लुळापांगळा असतो. म्हणजे गांवांतील सर्वांस मूठमूठ दिल्या जाणाऱ्या भिक्षेचा चारपंचमांश भाग धट्ट्या कट्ट्या लोकांस दिला जातो. म्हणजे आमचा चार पंचमांश दानधर्म अनाठायीं होतो. हिंदूंत गोसावी, आऽलुक बोवा वगैरे भीक मागणाऱ्या जाती व मुसलमानांत फकीर ह्यांचा पिढ्यानपिढ्या भीक मागण्याचा धंदाच आहे. सकाळीं उठावें झोळी घ्यावी. ‘ अल्ला तेरा भला करे ’ एवढा कोरडा आशिर्वाद द्यावा व ओंजळभर पीठ घ्यावें. अकराबारा वाजेपर्यंत भटकावें व झोळीभर पीठ आणावें. निसणें नको टुपणें नको. घरीं आल्यावर फकिरीण बाईनें भाकर करून घालावी. व ह्या राजश्रीनें तिच्यावर यथेच्छ ताव मारून दिवस सुखांत व चैनींत घालवावा.

फकीर ह्या शब्दाची उत्पत्ती ज्याला फिकीर ( चिंता ) नाहीं तो फकीर. अशी लावली तर वावगी व्हावयाची नाहीं. साहजिक आहे, योगक्षेम उत्तम रीतीनें चालूं लागला मग त्यानें फिकीर कां बाळगावी. धान्य जास्त मिळतें म्हणून हे लोक बाजारच्या दिवशीं पुन्हा विकून टाकतात. व पैसे जमवितात. अशा रीतीनें भिक्षेश्वरी तो लक्षेश्वरी होतो. आम्ही हिंदू भावनाप्रधान. घरांत पावशेर दाणे असतील त्यांतून देखील मूठभर धान्य आम्ही गोसाव्यास देतों. न जाणों देवच हें रूप

धारण करून आमचें सत्व पहावयास आला असेल असें वाटतें अशा रीतीनें स्वतः दरिद्री आहोंत तरी भ्रामक कल्पनास बळी पडून आम्ही आळशी लोकांचा वर्ग वाढवींत आहों. अशा धट्टया कट्ट्या गोसाव्या फकीरास बिलकूल कांहीं देऊं नये. ईश्वरी कोपाची बिलकूल भीति बाळगूं नये. फकीर भीक मागतांना " जो दे उसका भी भला न दे उसका भी भला " मग भिक्षा न घालण्यानें आपलें वाईट काय व्हावयाचें आहे ( त्याच्या शिव्या ऐकायला मिळतील एवढेंच ) त्यापेक्षां प्रत्येक खेडेगांवांत एक भिक्षागृह स्थापन करावें. त्यांत फक्त त्या गांवच्याच लुळया, पांगळ्या, आंधळ्या, बहिऱ्या, मुक्या निराश्रित वृद्ध अथवा अनाथ मुलांस आश्रय द्यावा. खेडेगांवांत तर ही संख्या १ । २ चे वर क्वचितच असेल. ज्यांना कांहीं द्यावयाचें असेल तें भिक्षागृहाचे सेक्रेटरीकडे पोहोंचतें करावें. लग्न मौंजी प्रसंगीं अगर अन्य प्रसंगीं मोठ्या देणग्याही भिक्षागृहास द्याव्यात. अशानें गांवचे समुच्चय धान्य व पैसे पुष्कळ जमतील व दोन तीन अनाथांचा चरितार्थ भागवून पुष्कळच उरेल. त्या उरलेल्या धान्यांतून व पैशांतून गांवच्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांस गांवीं अगर परगांवीं शिक्षणास मदत करावी म्हणजे आमच्या दानशूर ग्रामस्थांस, अनाथांस मदत केल्याचें व विद्यादानाचें पुण्य मिळेल. गरीब विद्यार्थ्यांस परिस्थितीमुळें ज्यास्त शिक्षण घेतां आलें नसतें व त्यांचें जन्माचें दारिद्य्र टळलें नसतें. त्यांच्या शिक्षणास मदत मिळाल्यानें बिचारे जास्त शिक्षण घेऊन पोट सुखानें भरूं लागतील. व त्यांचें दारिद्र्य टळेल.

# इतर कारणें.

हिंदू कायद्याप्रमाणें एकत्र कुटुंबांत जन्मास आलेला इसम, जन्मतःच एकत्र इष्टेटीचा वांटेकरी होतो व त्याला वाटेल तेव्हां आपला हिस्सा घेण्याचा हक्क आहे. अशा रीतीनें वडिलोपार्जित इष्टेटींत मुलगा बापापासून आपला हिस्सा वेगळा मागूं शकतो. शिवाय पांच भाऊ असले व ते एकत्र असले तर प्रत्येकास वेगळे रहाण्याची मुभा आहे. अशा रीतीनें कायद्यानें परवानगी मिळाल्याकारणानें ' दसकी लकडी एकका बोजा ' ह्या विरुद्ध प्रकार अस्तित्वांत आहे. पांच जोडीच्या कुटुंबास इष्टेटीच्या जोरावर इष्टेट वाढवितां येणें शक्य आहे. कारण एकीचें महत्वच असें कांहीं आहे. इंग्लंड सारख्या देशांत संघशक्तीची वाढ दिवसेंदिवस होत आहे, व आमच्या देशांत त्याच्या उलट प्रकार हर घडीस नजरेस पडत आहे. पांच भावांच्या एकत्र कुटुंबांत ऐक्यता फारचें थोडा काळ नांदते. कुठें वडील भाऊच दुर्व्यसनी निघतो म्हणून इतर भावास वाटेहिस्से करावेसे वाटतात, तर कुठें वडील भावासच सगळी मेहनत पडते व धाकटे आपले काळ चैनींत घालवितात. ह्या गोष्टीस कंटाळून वडील भाऊच हिस्से करायला लावतो तर कुठें कुठें जावांचेंच परस्परांशीं पटत नाहीं. म्हणून गृहसौख्याकरितां विभक्त राहणें भाग वाटतें. अशा ह्या नाहीं त्या निरानिराळ्या कारणानें कुटुंबें विभक्त झाल्याचीं शेंकडो

उदाहरणें आहेत. ह्यामुळें एकीचें सामर्थ्य जाऊन एकलकोंडेपणाची असहाय्यता आली आहे. व आमची दुर्बलता दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे. ह्या गोष्टीस आम्हां अल्पसंतुष्टपणा ह्यानेंही भर टाकली आहे.

'काय करायचें आहे दुसरा उद्योग करून आहे शेती पोटापुरती' अशा तऱ्हेचे उद्गार नेहमीं ऐकायला सांपडतात. पांच जोडीवाल्या पांच भावांचें एकत्र कुटुंब विभक्त झालें म्हणजे प्रत्येक भावास एक जोडीची शेती येईल, व प्रत्येक भावास समजा एकापेक्षां जास्त मुलें असलीं तर प्रत्येकाचे वांट्यास पोट भरेल इतकी शेतीही येत नाहीं. शिवाय शेती वाढविण्याचें सामर्थ्यही कोणाचे अंगीं नाहीं. अशा रीतीनें बाप सुखांत राहिला पण मुलास अन्नान्न दशा आली. शेतीवर व आपल्या वांट्यास येणाऱ्या हिश्शावर विसंबून न बसतां स्वतंत्र रीतीनें पोट भरायला शिकल्याशिवाय आमचे वाईट दिवस जायचे नाहींत.

इंग्लंडसारख्या देशांत वडील मुलासच सगळी इष्टेट मिळते, त्यामुळें बाप कोट्याधीश असला म्हणजे त्याच्या पश्चात् वडील मुलगा कोट्याधीश बनतो. पण धाकट्या मुलांस उन्नतीचा मार्ग स्वतःच्या मेहनतीनें गांठावा लागतो. पण हा कायदा आपणांस कसासाच वाटेल. आपल्या हिंदू कायद्याप्रमाणें वडील मुलगा व इतर मुलें ह्यांच्यांत बिलकुल भेदभाव न ठेवतां सर्वांस समानतेच्या दृष्टीनें वागविण्यांत येत

आहे. ही एक आनंदाचीच गोष्ट आहे. पण ह्यामध्येंही थोडी सुधारणा घडवून आणल्यास लोक सुखी होतील असें वाटतें. समजा बापास एक जोडीची शेती आहे व तीन मुलें आहेत. बाप जिवंत असेपर्यंत एकत्र इष्टेटींतून त्यानें वडील मुलास स्वतंत्र धंद्याचें जरी नाहीं तरी पोट भरूं शकेल इतकें शिक्षण दिलें पुढें बाप मेला. व दुसरीं दोन मुलें अज्ञान आहेत. अगोदरच सासूसुनांचें पटत नव्हतें व वडील मुलगा बाप मरतांच थोडया काळांत विभक्त झाला. आई दोन अज्ञान मुलांची पालन कर्त्री झाली. दोन तृतियांश इष्टेटींत पोट भरेना, कर्ज द्यायचे व शिवाय मुलांचें थोडेंबहुत शिक्षण करायचें म्हणजे ह्या कुटुंबास दारिद्र्यांत व हाल अपेष्टेंत दिवस काढावे लागणार तर वडील भाऊ सुखानें रहाणार शिवाय हीं दोन मुलें अविवाहीत तेव्हां त्यांचें लग्न कार्यही व्हावयाचें राहिलें. असो. एकाच कुटुंबांतील एक भाऊ सुखी व दुसरे दरिद्री. समानतेच्या कायद्यानें लॉ ऑफ प्रायमॉजेनिचर मधील दोष घालविला खरा पण अजून त्यांत माझ्या मतें वरील दोष आहेच. त्यापेक्षां एकत्र कुटुंबांतील सर्व (Coparceners) सज्ञान झाल्यावर विभक्त व्हावे अगर विभक्त होतांना कुटुंबांत जितके अज्ञान असतील त्यांच्या सुखाकरितां सज्ञानांनीं आपल्या हिश्शावर पाणी सोडावें. वडील सज्ञान भावास एकत्र इष्टेटींतून शिक्षण मिळालें, लग्न झालें म्हणजे अप्रत्यक्ष रीतीनें त्याला त्याचा हिस्सा मिळालाच आहे व स्वतंत्र रीतीनें तो त्याचें

पोटही भरूं शकतो. इतकेंही करून तो इष्टेटींत आपला हिस्सा मागूं लागला तर ती त्याची स्वार्थी बुद्धीच होय. ह्यापेक्षां त्यानेंच निस्वार्थी व निरपेक्ष बुद्धीनें धाकट्या अज्ञान भावांच्या हिताकरितां आपल्या हिश्श्यावर पाणी सोडावें. हिंदू कायद्या-प्रमाणें त्याला असें (renunciation) करतांही येतें. एकत्र कुटुंबांतील सर्वांचेंच शिक्षण झालेलें असेल, सर्वच सज्ञान असतील व सर्वांचे विवाहही झाले असतील तरी एकत्र इष्टेटीचे लहान लहान तुकडे करण्यापेक्षां सर्वांनीं आपला हिस्सा सर्वांत धाकटा असेल त्याला देऊन टाकला म्हणजे इष्टेट सुरक्षित राहील. अशा रीतीनें प्रॉयमॉजेनिचर किंवा एकत्र कुटुंबांतील एकत्र इष्टेटीच्या कायद्याऐवजीं जर अज्ञानांसच किंवा सर्वांत धाकटा असेल त्यालाच इष्टेट मिळावी, असा कायदा अमलांत आला तर पुष्कळ बरें होईल. व दिवसेंदिवस मोडकळीस येत असलेलीं घराणीं सुखानें राहूं लागतील. धाकटा भाऊ जन्मास आला म्हणजे वडील भावानें खास समजावें कीं, आपणास हिस्सा मिळणार नाहीं, तेव्हां आपण कष्ट केले पाहिजेत अशा रीतीनें उद्योगवृद्धीही होईल व सध्यांचें दारिद्र्य टळेल.

# सामाजिक अवनति.

आमच्या सध्यांच्या दारिद्याच्या मूळ बुडाशीं आमची सामाजिक अवनति आहे. दिवसेंदिवस आमच्यांत व्यक्ति-धर्माची ( individualism ) वाढ होत आहे. व्यक्तिधर्म, व्यक्तिप्रतिष्ठा, परमतअसहिष्णुता, आत्ममहात्म्य, स्वार्थ-लोलुपता, परक्याबद्दल तुच्छता, स्वदेशाभिमानशून्यता वगैरे ' सद्गुणांची ' झपाट्यानें वाढ होत आहे. देशाकरितां, समाजा-करितां, स्वमताचा, स्वार्थाचा त्याग करणारे लोक एके काळीं आमच्यांत होते. आज समाजधर्मापेक्षां व्यक्तिधर्माचेंच माहात्म्य वाढलें आहे. दिवसेंदिवस ही स्थिति पालटून संघशक्तीची जर वाढ झाली तर लोक सुखी होतील. शेती संघशक्तीनें केली, उद्योगधंदे संघशक्तीच्या पायावर उभारले, कौटुंबिक कायदे समाजधर्मास संमत असे बनविले, थोडक्यांत लिहायाचें म्हणजे व्यक्तिधर्माचे रावणीराज्य घालवन समाजधर्माचें रामराज्य स्थापन केलें तर लोक सुखी होतील. ' कलौ संघे शक्तिः ' अशी एक ऊक्ति आहे ती कांहीं विनाकारण नाहीं. संघशक्ति निर्माण झाली तर जाती जातींचे धर्माधर्मांचे तंटे माजणार नाहींत. सर्वांची जातसमाज, सर्वांचा धर्म समाज अशी तन्मयता झाली व खेड्यांत समाजधर्म वाढूं लागला तर तो सर्व राष्ट्रभर वाढण्यास कितीसा वेळ लागणार व मग स्वराज्य तरी कितीसें दूर असणार तरी सर्वांनीं समाज धर्माची वाढ करावी व सध्यांचें दारिद्य टाळावें, अशी लेखकाची नम्र विनंति आहे.

# उपसंहार.

अल्पबुद्धीस अनुसरून स्वानुभवानें व निरीक्षणानें नजरेस आलेलीं कारणें उपरिनिर्दिष्ट केलीं आहेत. ह्याशिवाय कांहीं कारणें असतील; नाहीं असें नाहीं. स्वतंत्रपणें तीं कारणें कोणी पुस्तकरूपानें छापिलीं तरीही देशहितच होईल. मी लिहिलेलीं आमच्या दारिद्र्याचीं कारणें व त्यावर सुचविलेले उपाय कदाचित् चुकीस पात्र असतील पण हीं माझीं " प्रामाणिक " मतें आहेत व देशहिताचें ध्येय समोर ठेवूनच मीं तीं वाचकांस सांगण्याचें धाष्टर्य केलें आहे. कल्पनासाम्राज्याच्या अशक्यतेच्या-नंदनवनांत वाचकांस न नेतां शक्यतेच्या साध्याच उपवनांत फिरण्यास आणलें आहे, अशी वाचकांची प्रस्तुत पुस्तक वाचतांना खात्री पटेल. कांहीं गोष्टी थोड्याशा अशक्य—तत्काळ घडण्यास—वाटणें साहजिक आहे, पण म्हण आहे कीं, ' रोम शहर कांहीं एका दिवसांत बांधलें गेलें नव्हतें. ' तद्वतच प्रयत्न करण्याची दृढ इच्छा सदैव जागृत ठेवून आपण आपल्या अल्पशा शक्तिनुसार प्रयत्न करूं लागलों तर कालावधींत आपण अचाट कृत्येंहीं करूं शकूं. मग खेडेगांवचें दारिद्र्य घालविण्यासारखी क्षुल्लक गोष्ट तर तेव्हांच साध्य करितां येईल.

खेडेगांवांतील लोकांनीं ग्रामसुधारणेचा प्रश्न स्वतः हातांत घेतला पाहिजे पण त्यांना ह्या बाबतींत शहरांतील सुशिक्षि-

तांनींही मार्ग दाखविला पाहिजे व कायदेकौन्सिलांतील मेंबरांनीं चांगलेसे कायदे पास करून उत्तम मदतही केली पाहिजे. अशा-रितीनें सर्वांनींच ह्या कामीं हातभार लाविला तर ग्रामसुधारणा तत्काळ घडून येईल व हिंदुस्थानची शेंकडा ऐंशी प्रजा सुखी होईल, देशांत सुबत्ता नांदेल.

वरील कल्पना–चित्र खरें ठरून देशास भाग्याचे व सुखाचे दिवस लवकरच येवोत अशी प्रभुपदीं प्रार्थना करून हें छोटे-खानी पुस्तक समाप्त करितों.

**वंदे मातरम्.**

REFBK-0003036

REFBK-0003036

ग्रं. क्र. 3036